| MHND060014762025 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२३०/२०२५<br>पारुबाई पिराजी इबिते<br>वि.<br>दि.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सह बॅक लि.<br>शाखा कुंटूर, ता.नायगाव खै. जि.नांदेड. |
| --- | --- |

## नि.क्र. ०१ खालील आदेश पारित

**( घोषीत दिनांक १०.०६.२०२६ )**

अर्जदाराने इंडीयन सक्सेशन ॲक्ट अंतर्गत उत्तराधिकार प्रमाणपत्र जारी करण्याची विनंती केली.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ पत्नी, अर्जदार २ व ३ हे **मयत पिराजी पि. शंकर इबिते** यांची मुले आहेत. **मयत पिराजी पि. शंकर इबिते** यांचे दिनांक ११.११.२०२२ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस व हक्कदार असल्याचा त्यांनी दावा केला आहे.

३. **मयत पिराजी पि. शंकर इबिते** यांनी गैरअर्जदार यांच्या बॅक बचत खाते क्रमांक ११४७१०००१००२८७४ मध्ये रक्कम रू.२४,२०३/— जमा आहेत. सदर जमा रक्कम रू.२४,२०३/— त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हे घेण्यास कायदेशीररीत्या हक्कदार आहे. संबंधीत अधिका—यास सदर रकमेची मागणी केली असता त्यांनी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची गरज असल्याचे सांगितले. म्हणून त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्जाअंतर्गत केलेल्या मागणी संदर्भाने दिनांक २९.१०.२०२५ रोजीच्या ''गोदातीर समाचार'' या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रदर्शीत करुन सर्व जनतेस सदर मागणी निदर्शनास आणून दिली व कोणाचा आक्षेप असल्यास नोंदविण्यास सांगीतले. तसेच त्या संदर्भाने न्यायालयामार्फत नोटीस देखील गैरअर्जदार यांना काढण्यात आली. गैरअर्जदार यांना नोटीस तामील झाली. गैरअर्जदार यांना नोटीस तामील होवुन सुध्दा ते या प्रकरणात हजर झाले नाही. म्हणुन सदर प्रकरण त्यांच्या विरूध्द एकतर्फा चालविण्यात आले. तसेच

कोणीही आजतागायत न्यायालयासमोर हजर होवून कुठल्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर नोंदविला नाही.

**५.** अर्जदार क्र.१ ते ३ यांनी मयत पिराजी पि. शंकर इबिते यांच्या नावे असलेली रक्कम उचलण्याकरीता तेच वारसदार असल्याचा दावा केला. त्याकरीता अर्जदार क्र.३ याने त्याची साक्ष निशाणी क्र.१२ वर नोंदविली. त्याने शपथेवर कथन केले की, अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत पिराजी पि. शंकर इबिते यांची वारस आहे. अर्जदार यांनी सिध्द केलेले मयत पिराजी पि. शंकर इबिते यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत (निशाणी क्र.५/१) खाली दाखल आहे. सरपंच कुंभारगाव, ता.बिलोली, जि.नांदेड यांनी दिलेला वारसाचे प्रमाणपत्र (निशाणी क्र.५/२), अर्जदार क्र.१ ते ३ यांचे आधार कार्डाची पडताळणी केलेल्या प्रती (निशाणी क्र.५/३ ते ५/५), तसेच गैरअर्जदार यांच्या बॅकेमध्ये मयत पिराजी पि. शंकर इबिते यांच्या नावे खाते असल्याची बॅक स्टेटमेंटची प्रत (निशाणी क्र.५/६) खाली दाखल केले आहे. तसेच गैरअर्जदार यांच्या बॅकेमध्ये मयत पिराजी पि. शंकर इबिते यांच्या नावे असल्याची रक्कम देखील अर्जदाराच्या लेखी पुराव्यावरुन सिध्द होते.

**६.** दिनांक १९.१०.२०२५ रोजीचे दैनिक ''गोदातीर समाचार'' मधील जाहीर प्रगटन (निशाणी क्र. ११ खाली) या वरुन सर्व जनतेस अर्जदारांच्या मागणी अर्जाची माहिती जाहीर करण्यात आली होती. परंतु कोणत्याही व्यक्तिने न्यायालयासमोर येवून सदर मागणीस आक्षेप नोंदविला नाही. अर्जदारांच्या कथनास कुठेही आव्हान मिळाले नाही. करीता अर्जदारांनी सादर केलेल्या पुराव्यावर विश्वास ठेवून त्यांचे म्हणणे मान्य करावे लागेल. म्हणून अर्जदार हेच मयत पिराजी पि. शंकर इबिते यांची कायदेशीर वारस व हक्कदार आहेत.

**७.** अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत पिराजी पि. शंकर इबिते यांचे कायदेशीर वारस व हक्कदार असल्याचे सिध्द केल्यामुळे, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र.१ ते ३ यांना मयत पिराजी पि. शंकर इबिते यांचे कायदेशीर वारस व हक्कदार असल्याचे घोषीत करण्यात येत आहे. त्यांना उत्तराधिकार प्रमाणपत्र मयताच्या नावावर येणे असलेली गैरअर्जदार यांच्याकडील बचत खाते क्रमांक ११४७१०००१००२८७४ मध्ये रक्कम रू.२४,२०३/— जमा आहे. सदर रक्कम रू. २४,२०३/— व्याजासह प्राप्त करण्याकरीता नियमाप्रमाणे न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे. |
| ३. | नाझर, सहाय्यक अधिक्षक यांचा न्यायालयीन शुल्काबाबत अहवाल मागवावा. |

ASHISH DATTATRAYA SURYAWANSHI

Digitally signed by ASHISH DATTATRAYA SURYAWANSHI
Date: 2026.06.10 12:43:40 +0530

बिलोली.
दिनांक : १०.०६.२०२६

( ए. डी. सूर्यवंशी)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
बिलोली.

# प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करून घातलेल्या आदेशामधील शब्दन्शब्द हा मुळ न्यायनिर्णया प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : ए.के. मोहम्मद |
| न्यायालयाचे नाव | : सह दिवाणी न्यायालय, क स्तर, बिलोली |
| न्यायनिर्णय दिनांक | : १०.०६.२०२६ |
| आदेशावर पिठासीन अधिकारी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : १०.०६.२०२६ |
| आदेश संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करून घातल्याचा दिनांक | : १०.०६.२०२६ |